# विद्यार्थ्यांच्या संशोधनाला मिळावे व्यासपीठ : कोठारी

## क. का. वाघ महाविद्यालयात चर्चासत्राचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा



नाशिक : क. का. वाघ महाविद्यालयात आयोजित चर्चासत्रात सहभागी झालेले उद्योजक.

नाशिक, ता. १५ : उद्योजकांना अपेक्षित असलेला विद्यार्थी घडविण्यासाठी उद्योग क्षेत्रातील अधिकाऱ्यांची व्याख्याने उपयुक्त ठरू शकतात. विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण कल्पना, संशोधन उद्योगांना उपयुक्त असून, त्यास योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे, असे मत इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स नाशिक शाखेचे अध्यक्ष मनीष कोठारी यांनी केले.

क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे जिल्ह्यातील प्रमुख कंपन्यांचे 'सीईओ, प्रकल्पप्रमुख, व्यवस्थापक यांचे राऊंड टेबल चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. 'महिंद्र ॲण्ड महिंद्र'चे उपाध्यक्ष हिरामण आहेर म्हणाले, की अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाशी उद्योगातील प्रत्यक्ष ज्ञानाची सांगड घालून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास महाविद्यालयांनी वाढवायला हवा. शारदा मोटर्सचे 'सीईओ' अतुल सेठ, 'बीएसएनएल'चे महाप्रबंधक सुरेशबाबू प्रजापती, डेल्टा फिनोकेम प्रा. लि.च्या शरयू देशमुख, रिलायन्स कम्युनिकेशनचे उपमहाव्यवस्थापक मनीष आंबेवडीकर, गिलबर्ट मॅक्सवेलचे संचालक प्रदीप देशपांडे आदी मान्यवरांनी आपले अनुभव या वेळी व्यक्त केले.

तंत्रज्ञान दिवसेंदिवस बदलत आहे. औद्योगिक कारखान्यांसाठी अभियांत्रिकीचे पदविका, पदवीबरोबरच विद्यार्थ्यांना अखेरच्या टप्प्यात उद्योगासाठी आवश्यक असणारे कौशल्य विकसित करण्यासाठी महाविद्यालयांत प्रयत्न व्हावेत, असा सूर चर्चासत्रात उमटला. प्रास्ताविकात क. का. वाघ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी संस्थेविषयी माहिती दिली. या वेळी क. का. वाघ शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशीनाथदादा टर्ले, चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट, समीर वाघ, डॉ. शिरीष साने, डॉ. प्रीती भामरे, सचिव के. एस. बंदी, सुषमा मर्चंट, स्माईलचे सचिव अजिंक्य वाघ आदी उपस्थित होते. प्राजक्ता विसपुते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. के. शहाबादकर यांनी आभार मानले. चर्चासत्रात ९५ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

करण्यात यावी, आश्वासन दिले.

# वाघ कॉलेजमध्ये कंपन्यांचे चर्चासत्र

**म. टा. प्रतिनिधी,** पंचवटी

पंचवटीतील अमृतधाम येथील के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये शहर व जिल्हाभरातील विविध नामवंत कंपन्याचे प्रमुख, सी. ई. ओ, प्रकल्प प्रमुख, व्यवस्थापक आणि तज्ज्ञ इजिनीअर्स यांचे एकदिवसीय चर्चासत्र झाले. चर्चासत्रात कंपन्यांना कशा प्रकारच्या इंजिनीअर्स व कामगारांची गरज आहे यावर चर्चा करण्यात आली.

मेकॅनिकल, सिव्हील, इलेक्ट्रिकल या विभागतील तज्ज्ञ या चर्चासत्राला उपस्थित ोते. यावेळी नाशिकच्या इन्स्टिट्यूट ऑफ जिनीअर्स शाखेचे अध्यक्ष मनीष कोठारी ांनी सांगितले की, उद्योजकांना अपेक्षित सलेला विद्यार्थी घडविणेसाठी उद्योग ातील अधिकाऱ्यांची व्याख्याने वेळोवेळी वीत. महिंद्र आणि महिंद्राचे उपाध्यक्ष हिरामण आहेर यांनी यावेळी सांगितले कि, इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाशी उद्योगातील प्रत्यक्ष ज्ञानाची सांगड घालून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कॉलेजेसनी वाढवायला हवा. यावेळी शारदा मोटरचे अतुल सेठ, बीएसएनएलचे महाप्रबंधक सुरेश बाबू प्रजापती, डेल्टा फिनोकेमच्या शरयू देशमुख, रिलायन्स कम्युनिकेशनचे मनीष आंबेवाडीकर, गिलबर्टचे प्रदीप देशपांडे यांनी आपले अनुभव सांगितले.

तंत्रज्ञान दिवसेंदिवस बदलत आहे. त्यामुळे उद्योगासाठी आवश्यक असणारे ज्ञान, कौशल्य विकसित करण्यासा कॉलेजमार्फत प्रयत्न करण्यात या असा सूर चर्चासत्रात उमटला. तसे विद्यार्थ्यांना अशाप्रकारचे ज्ञान मिळवू देण्यासाठी कॉलेजेस व प्राध्यापकांनी अपडेट राहण्याची गरज यावेळी व्य करण्यात आली.

यावेळी स्वागत व प्रास्ताविक प्राचा डॉ के. एन.नांदूरकर यांनी केले. अध्य बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशिना टरले, चांगदेव होळकर, अशोक म समीर वाघ यासह विविध मान्यवर उपस्थि होते.

फोटो : सतीश काळे

